.          ..     ..          <u>नियमित दिवाणी मुकदमा क्र.२९/२०१३</u>

निशाण क्र.५६ लगत

<u>वादी यांचा प्रतिवादी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री.एल.एल.नाथगोसावी यांचेमार्फत उलटतपास सुरू.</u>

२९.   माझा जन्म दि.३०/०९/१९५७ इ. रोजीचा आहे. माझे शिक्षण इयत्ता आठवीपर्यंत झाले आहे. इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतचे शिक्षण मुंबई येथे व आठवीपर्यंतचे शिक्षण गावी घेतले. मला लिहिता वाचता येते. दाव्यातील माहिती मी वाचली आहे. सदर माहिती माझ्या माहितीनुसार कथीत केली आहे. माझे आठवीपर्यंतचे शिक्षण झाल्यानंतर मी गावीच होतो. माझे वडील पोलीस खात्यात मुंबई येथे नोकरीस होते व ते सन १९८० चे आसपास निवृत्त झाले. निवृत्त झाल्यानंतर ते गावीच राहत होते. या कामी सदनिकेचे खरेदीपत्र व वादातीत मृत्युपत्र मी पाहिले आहे. खरेदीपत्र व मृत्युपत्रामधील मजकूर, साक्षीदार, तारीख व वेळ माझ्या माहितीची आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१५/१०/२०११ इ. रोजी सकाळच्या वेळी माझ्या वडिलांनी वादातीत सदनिकेचे अंतिम खरेदीपत्र विवेक नलावडे याच्याकडून करून घेतले. माझ्या माहितीनुसार माझ्या वडिलांनी वादातीत सदनिकेचे खरेदीपत्र दि.१५/१०/२०११ इ. रोजी करून घेतले. दि.१५/१०/२०११ इ. रोजी खरेदीखत करतेवेळी माझ्या वडिलांची शारीरिक व मानसिक अवस्था बरोबर नव्हती.

प्रश्न — खरेदीखत करतेवेळी वडिलांची शारीरिक व मानसिक अवस्था बरोबर नव्हती हे तुम्हांस कधी कळाले ?

उत्तर — वडील आजारी पडल्यापासूनच त्यांची शारीरिक व मानसिक अवस्था बरोबर नव्हती, त्यामुळे नंतर कळण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

माझ्या वडिलांनी वादातीत सदनिकेचे करून घेतलेले खरेदीपत्र बेकायदेशीर व चुकीचे आहे असे माझे म्हणणे नाही. ज्यावेळी हे खरेदीपत्र करायचे होते त्यावेळी माझ्या वडिलांनी आम्हा सर्व भावंडांना हे खरेदीपत्र करायचे आहे याची कल्पना दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, आम्हा सर्व भावंडांच्या जाणीवेने माझ्या वडिलांनी वादातीत सदनिकेचे खरेदीपत्र पूर्ण केले. आम्ही भावंडांनी आमच्या वडिलांना तुमची शारीरिक

... ....

व मानसिक अवस्था बरोबर नाही त्यामुळे तुम्ही खरेदीपत्र करू नका असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदनिका अंतिम खरेदीच्या वेळी माझ्या वडिलांची शारीरिक व मानसिक अवस्था बरोबर होती म्हणून आम्ही त्यांना तुमची शारीरिक व मानसिक अवस्था बरोबर नाही त्यामुळे तुम्ही खरेदीपत्र करू नका असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, अंतिम खरेदीपत्र झाले त्याच दिवशी माझया वडिलांनी या सदनिकेचे मृत्युपत्र महेंद्रच्या नावे करून दिले.

प्रश्न — तुमच्या माहितीनुसार तुमच्या वडिलांनी महेंद्रच्या नावे मृत्युपत्राचा लेख किती तारखेला करून दिला ?

उत्तर — माझ्या वडिलांनी महेंद्रच्या नावे मृत्युपत्राचा लेख करूनच दिला नाही.

न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारीखपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.१२/०२/२०१८. सही/—

दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

....